**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 6** **July-Aug 2024**

# लोकसाहित्यातील स्त्री जीवन चित्रण

**Dr.Balasaheb Laxman Laware**
Assitant Proffesor, Department of Marathi,S.B.V.P.Samaj,Loknete Balasaheb Thorat Arts,Commerce and Science College Talegaon Dighe ,Tal.Sangamner ,Dist.A.Nagar
**Corresponding Author: Dr.Balasaheb Laxman Laware**
**Email:** lavrebalasaheb97@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13382872**

**घोषवारा:**

भारतात प्राचीन काळापासून लोकसाहित्यातील परंपरा अतिशय समृध्द आणि विविधतापूर्ण आहे. लोकसाहित्य ही संज्ञा व्यापक असून यामधून येथील लोकजीवनाचा, लोकमनाचा, स्थल—काल—प्रदेशाचा आणि लोकसंस्कृतीचाही अभ्यास करता येतो. लोकसाहित्याचा शास्त्रीय चिकित्सा करुन लोकगीतांची क्षमता आणि लोकगीतांची शास्त्रीय चिकित्सा करुन लोकगीतांच्या स्वरुप यांवर प्रकाश टाकला जातो. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात हे संकलन केवळ संकलित स्वरुपात विशिष्ट प्रदेशापुरते मर्यादित न राहता ते शास्त्रीय दृष्टीने, वैश्विक पातळीवर मांडले जावे, त्यास आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दयावी. तेव्हा आजच्या विज्ञाननिष्ठ तरुण पिढी मध्ये लोकगीतांचे केवळ संकलन न करता त्यामधील नानाविध दृष्टीकोण आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात लक्षात आणून दिले तर हे साहित्य 'अक्षर वाड्मय' ठरेल. लोकसाहित्यातील प्रामुख्याने स्त्रीगीते, पुरुषांची गीते आणि स्त्री पुरुषांची एकत्रित गीते असे वर्गीकरण केले जाते. लोकसाहित्य म्हणजे महाराष्ट्रातील मराठी संस्कृतीचा आरसा होय. लोकसाहित्यातून महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब आपणास पाहावयास मिळते. लोक हा शब्द सामान्य माणूस किंवा स्थान या दोन्ही अर्थाने वापरला जातो. या लोकांची परंपरा असलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य अशाीही त्याची उत्पत्ती सांगितली जाते. लोकसाहित्य म्हणजे सर्वसामान्य लोकांचे साहित्य. हे साहित्य लोकांकडूनच निर्माण झालेले असते.

**बीजशब्द:** लोकसाहित्य, लोक, परंपरा, संस्कृती, समाज, अभ्यासक, प्रथा, मौखिक, लोकगीते, लोकसंस्कृती.

**प्रास्ताविक:**

वैविध्यपूर्ण भारतीय संस्कृती, संघर्ष—समन्वय यातून नवस्वीकृती प्रक्रिया, अन्नप्राप्ती: आदिम समाजाची मूलभूत समस्या— यातून सर्जन शक्तीची आराधना, भारतीय लोकपरंपरांतील प्राणभूत एकात्मता, चैत्रगौर : प्रकाशवृक्ष सूर्याशी असलेल्या धरतीच्या नात्याचा सत्कार, भाद्रपद आश्विन: सर्ज वर्षन शक्तीची आराधना, अन्ननिर्मिती: आदिजीवनाची प्रेरणा, व्रतांमधील सामर्थ्य त्यांतील स्त्रीप्रधानता, आदिवासीच्या देवता, धरती आणि कणसरी गोपलवैदिकांनी कृषिजीवनाचा स्वीकार केला, भूमी सुफलित करण्याचे विधी स्त्रीकडे, संघर्ष स्वीकार आणि समन्वय, दैवी दाम्पत्ये : वैशिष्टये, प्राचीन देवतांचे उन्नयन, भारतीय संस्कृतीचा इहिास हा समाजनिर्मितीचा इतिहास, भारताची भागौलिक रचना एकात्मतेसाठी अनुकूल, ऋतुचक्र आणि भारतीय सण, उत्सव आदिपर्वातील यातुन श्रध्दा आणि समूहश्रध्दा, लोकपरंपरा आणि समूहमन, लोकपरंपरा आणि लोकसाहित्याचा अभ्यास प्रेरणा, लोकसाहित्यातील स्त्री जीवनाशी जोडलेले रीतिरिवाज आजही हरवलेले नाहीत, अनुबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न, या शोधामागील भूमिका आहे.

**संशोधनाची उदिदष्टये:**

१. लोकसाहित्यातील स्त्री जीवनावर आधारित साहित्याचा शोध घेणे.
२. लोकसाहित्यातील स्त्री जीवनातील दैनंदिन जीवनातील श्रध्दास्थान अभ्यासणे.
३. लोकसाहित्यातील स्त्री जीवनातील लोकसाहित्यातील मौखिक साहित्याचे स्पष्टीकरण करणे.

**संशोधनाचे महत्व:**

१. लोकसाहित्यातील स्त्री जीवनाच्या विविध भूमिका समजते.
२. लोकसाहित्यामुळे स्त्री जीवनाच्या मानसशास्त्राच्या पैलूचा उलगडा होतो.
३. लोकसाहित्यामुळे स्त्री जीवनाचे समजेल या स्वरुपाचे तत्वज्ञान अभ्यासण्यास मिळते.
४. लोकसाहित्यातील स्त्री जीवनामुळे आजची स्त्री व लोकसाहित्यातील स्त्री या दोन्ही बाजू समजून घेता येतात.

**लोकसाहित्यातील स्त्री जीवन चित्रण:**

एकंदर मानवी जीवनातील विविध अवस्थांत लोकगीत माणसाची साथसोबत संगत करते. श्रध्दाशीलता हा लोकजीवनाचा स्थायी विशेष आहे. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत विविध क्षणी स्त्री लोकगीताचा आश्रय करते. स्वत:चे पाप जळून जावे आणि पुण्य पदरात पडावे म्हणून स्त्री तुळशीची स्तुती करते.

तुळ वंदावी मावली
संताची सावली

तुळशीचे दर्शन घेता घेता तिला श्री विठठलाचे दर्शन होते. हा दर्शनभाव ती व्यक्त करते.

गेलेवते तुळशीपाशी
तितं हुता रुशीकेशी

आनिक माजा नमस्कार
पोचू दे देवा पांडुरंगाशी

एके काळी भारतीय स्त्रीला पतीला परमेश्वर मानून त्याची सेवा करण्यात धन्यता वाटत होती.

जाचू नका राया, तुमच्या पायाची मी दासी
राहीन उपाशी, घास घालीन तुमासी

ही स्त्री केवळ पतीला परमेश्वर मानून थांबत नव्हती. तर पतीविषयीची तिची निष्ठा इतकी तीव्र होती की, ती नवऱ्या अगोदर मरण्याचीच इच्छा धरते. आपला पती दीर्घायुषी व्हावा म्हणून ती सतत देवाची प्रार्थना करते.

अहेव मरण कोण्या भाग्याच्या सईला
डोईचा मंदील, कंथ वाळवितो नयीला
हात जोडिते, उगवत्या बाणाला
आयुष्य मागते माझ्या कंथाला

पतीसेवेत रममाण होणारी स्त्री, आपले सासु—सासरे, नणंद, दीर, जावा या सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना न करती तरच नवल.

सासू सासरे आहेत देव्हारीचे देवू
त्याचे आधी, माझे बाई नको जेवू

पुरुषकेंद्री समाजात स्त्रीचे अस्तित्व गौण आणि तुच्छ मानले गेल्याने तिच्या जन्माच्या अगोदरपासूनच तिला नकार देण्यात येतो. मुलगी जन्माला आल्यापासून तिच्या वाटयाला हा नकार, अवहेलना येते. 'ज्याच्या नशिबी पाप त्याला लेकी' अशी लोकसमजूत असल्याने तिचा जन्मच सर्वांना नकोसा वाटतो. स्वाभाविकच एखादया गीतातून 'नको हा स्त्री जन्म' ही भावना उत्कटत्वाने व्यक्त होते.

देवा नारायण माझी विनंती फार फार
जन्म बायकांचा नको घालूस वारंवार

एकंदरीत स्त्रीगीतातून व्यक्त होणारे स्त्रीजीवनानुभवाचे क्षेत्र, हे पुरुषप्रधान व्यवस्थेचे अंकित असल्यासारखे जाणवते. प्रतिकुलतेवर मात करुन आपले मन गीतांतून मोकहे करीत, जीवन जगण्याचा प्रयत्न लोकसमाजात होताना आढळतो. तसाच सण, उत्सव, विधी याप्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा स्त्रीजीवनात आजही रुढ आहे. अशा प्रसंगीच्या गीतातून देवदेवतांविषयीच्या श्रध्दा आणि संसारातील सुखदु:खाच्या भावनांचा अविष्कार केला जातो. तसेच बाळासाठी आशीर्वादाची याचना केली जातो. तसेच बाळासाठी आशीर्वादाची याचना केली जाते.

माय सटवाई सटवाई
रानात तू ग राही
नशीब बाळाचं लिही
पूजा बांधिले आई सटवाई
राजाचं सुख आनं सम्रत बाळाठाई ।।

**निष्कर्ष:**

सामान्यत: स्त्रीगीतांचे प्रमाण जास्त असल्याने लोकगीत म्हणजेच स्त्रीगीते अशी संकल्पना रुढ झालेली दिसून येते. लोकगीते ही स्त्री मनाचा उत्स्फूर्त अविष्कार, व्यक्ती मनाची निर्मिती असली तरी ती समूह निर्मिती कधी होते ते लक्षात येत नाही. यामुळेच ते एका स्त्री मनासोबतच समग्र मानवी मनाचे भावपूर्ण दर्शन घडवते. हेच या लोकगीताचे व्यवच्छेदक लक्षण मानावे लागते. मानवी मन हे एक अजब गुढ आहे, मन हे सुख दु:ख जाणणारे इंद्रिय आहे. ज्याचा अचूक अंदाज मानसशास्त्रीय प्रयोग शाळेतील मानसशास्त्रज्ञांना करता आलेला नाही.त्या मानवी मनाला नेमके आणि अचूकपणे टिपण्याचे काम भारतीय स्त्रियांनी लोकगीतातून केलेले दिसते. यामधून आपल्या जीवनातील नातेसंबंध, सुख—दु:ख, आनंद, प्रेम, विरह, गरिबी, श्रीमंती याबरोबरच स्त्री जीवनातील विविध पैलूचे दर्शन घडते. म्हणून अशा लोकमनाचा अभ्यास आजच्या यंत्र, तंत्र, विज्ञानाच्या युगातही उपयुक्त व महत्वपूर्ण वाटतो.

लोकगीतातील स्त्री जीवनाचा आढावा घेत असताना आपणास ती सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने उपेक्षित राहिलेली दिसून येते. एक उपभोग्य वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जात असे. तिच्या मनाची फारशी दखल तत्कालीन समाजव्यवस्थेने घेतलेली दिसून येत नाही. तिचे मन हे अतिशय हळवे, प्रेमळ व संवेदनशील असलेले दिसून येते. तिने एक आई, पत्नी, बहीण, मुलगी, सासू—सून, नणंद—भावजय, सखी (प्रियसी) म्हणून जे जीवन जगले अनुभवले त्याचा अविष्कार लोकगीतांच्या द्वारे करुन तिने आपले मन हलके केले. त्यामेळे ती 'सोशिक' असूनही रसिक व समाज जीवनाला पोषक अशी वातावरण निर्मिती करताना दिसते. यासाठी तिचा एक आदर्श नारी म्हणून उल्लेख करणे महत्वपूर्ण वाटते. कारण तिचा आपले मन आणि मनगट यावर प्रबळ विश्वास असलेला दिसून येतो. एवढेच नव्हे तर वेळ प्रसंगी कठोर निर्णय भूमिका घेण्याचे सामर्थ्य असलेली नारीशक्ती ही तिच्यामधून जागृत झालेली दिसते. परंतु आज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक दृष्टया सबलीकरण झाले असले तरी त्यांच्या मनाची मनोदुर्बलता जास्त प्रमाणात दिसून येत आहे, त्यासाठी आजच्या महिलांनीही अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा, स्त्री—पुरुष समानता, पर्यावरण रक्षण याच बरोबर समाजातील दुजाभाव करणाऱ्या घटना—प्रसंगाना सामर्थ्यांने तोंड दिले पाहिजे तसेच एक आई, बहीण, पत्नी, सासू—सून, नणंद—भावजय, मुलगी, प्रियसी अशा विविध भूमिकेत उभी राहत असताना आपल्या नवविचारांची आणि मनाची उंची ही वाढवली पाहिजे. जुन्याचा बोध व नव्याचा शोध घेतला पाहिजे. यासाठी तिने 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगा उध्दारी' असे पारंपारिक जीवन न जगता 'जिच्या हाती इंटरनेट तीच भिडेल आकाशला थेट' अशा प्रकारच्या नव विचारांची पेरणी या लोकगीतांच्या प्रेमळ संदेशातून व्हावी. म्हणेजच तिने प्रेमाचा जिव्हाळा जपणारी पानमळा झाली पाहिजे.

तेव्हाच खऱ्या अर्थाने भारतीय 'नारी' जगात इतरांच्या तुलनेत 'भारी' दिसेल. हाच स्त्री मनाचा मोठेपणा आपणांस सांगता येईल.

**संदर्भ:**

१. भवाळकर तारा: 'लोकसंचित', राजहंस प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९८९,पृष्ठ क्र २. तत्रैव : 'वाड्मय प्रवाह', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम आवृत्ती, प्रकाशन १९९२, पृष्ठ क्र. ८.

२. मांडवकर, भाऊ, विदर्भ आणि लोकसाहित्यलेखनाचा आलेख, वैदर्भीय लोकसाहित्य, सेवा प्रकाशन, अमरावती, पहिली आवृत्ती, १९८६, पृ.१५.
३. भागवत, दुर्गा, प्रस्तावना, लोकसाहित्याची रुपरेषा, वरदा बुक्स पुणे, दुसरी आवृत्ती,१९७७.
४. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम, लोकसाहित्यः उद्‌गम आणि विकास, लोकसाहित्य स्वरुप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर पहिली आवृत्ती, २००७ पृ. १०
५. डॉ. गंगाधर मोरजे, प्रस्तावना, लोकसाहित्यः एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, दास्ताने रामचंद्र अॅड कं. पुणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ ८
६. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, पृष्ठ ३९
७. डॉ. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य मिमांसा भाग १, पृष्ठ ५९—६०